मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी-चिंचवड शहरातील 88 धोकादायक इमारत

## एक अतिधोकादायक इमारत महापालिकेने पाडली; 74 जणांची महापालिकेच्या नोटिशीकडे दुर्लक्ष

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील ८८ धोकादायक इमारती व घरे असलेल्या मालकांना महापालिकेने पावसाळ्यापूर्वी नोटीस बजाविल्यानंतर १३ घरमालकांनी दुरुस्ती करवून घेतली. एक अतिधोकादायक इमारत महापालिकेने पाडली. तर, ७४ जणांनी महापालिकेच्या नोटिशीकडे दुर्लक्ष केले आहे.



पावसाळ्यात धोकादायक इमारत कोसळून दुर्घटना घडण्याची शक्यता असते. त्यासाठी महापालिकेकडून जुन्या इमारती, वाडे, घरे यांचे सर्वेक्षण करून धोकादायक इमारती निश्चित केल्या जातात. यंदा शहरात ८८ धोकादायक इमारती आढळून आल्या. त्यात सहा इमारती अतिधोकादायक आहेत. 'ड' क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील धोकादायक इमारतींची सर्वाधिक ३७ संख्या आहे. महापालिकेने ८८ इमारतमालकांना धोकादायक बांधकामे स्वतःहून काढून घ्यावीत किंवा तातडीने दुरुस्त करून घ्यावीत, अशा नोटीस बजावल्या होत्या. त्यांपैकी १३ इमारतींची मालकांनी दुरुस्ती करवून घेतली; तर एक इमारत महापालिकेने पाडली आहे. त्यामुळे सद्य:स्थितीत ७४ धोकादायक इमारती शहरात आहेत.

या इमारतीच्या मालकांनी महापालिकेच्या नोटिशीकडे दुर्लक्ष केले आहे. त्यात दोन अतिधोकादायक इमारती आहेत. आठ इमारतींमधील रहिवाशांना इमारत रिकामी करून दुरुस्ती करण्याची आवश्यकता आहे. १४ इमारती रिकाम्या न करता दुरुस्त होऊ शकतात, तर ५० इमारतींना किरकोळ दुरुस्तीची आवश्यकता आहे. महापालिकेचे उपअभियंता अश्लेष चव्हाण म्हणाले, 'महापालिकेने धोकादायक इमारतीच्या मालकांना नोटीस बजावली आहे. इमारतीची दुरुस्ती न केल्याने काही दुर्घटना घडली, तर त्यास इमारतमालक जबाबदार असतील.'

---

# पिंपरी महापालिकेची 'डीएमएस' प्रणाली बंद

## दोन दिवसांपासून महापालिकेचे सर्व प्रशासकीय कामकाज ठप्प, यंत्रणा मंगळवारपासून बंद

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेने ११२ कोटी रुपये खर्च करून एक एप्रिल २०२५ पासून सुरू केलेली दस्तऐवज व्यवस्थापन प्रणाली ( डीएमएस) यंत्रणा मंगळवारपासून बंद पडली आहे. त्यामुळे दोन दिवसांपासून महापालिकेचे सर्व प्रशासकीय कामकाज ठप्प झाले आहे. आज (गुरुवारी) प्रणाली सुरू करण्यासाठी तांत्रिक उपाययोजना केल्या जात असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.



निगडी येथील डाटा सेंटरमध्ये विद्युतविषयक आणि तांत्रिक अडचण निर्माण झाल्याने मंगळवारपासून ही यंत्रणा बंद आहे. पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने एक एप्रिलपासून कागदविरहित प्रशासनाकडे वाटचाल सुरू केली. कामकाजात दस्तऐवज व्यवस्थापन प्रणाली (डीएमएस) आणि कार्यप्रवाह प्रणाली (डब्ल्यूएफ) वापरण्यास सुरुवात केली. यासाठी पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेडने जीआयएस एनेबल ईआरपी प्रकल्पांतर्गत ३३ संगणक प्रणाली विकसित केल्या आहेत. महापालिकेतील अधिकारी, कर्मचाऱ्यांचे वेतन व ठेकेदारांची देयके काढण्यासाठी 'सॅप' प्रणालीचा वापर केला जात आहे. विभागप्रमुख, वरिष्ठ अधिकारी, प्रशासन अधिकारी, शाखा प्रमुख, लिपिक यांना प्रशासकीय कामकाजासाठी डिजिटल कोड देण्यात आले आहेत. एक हजार ७०९ डिजिटल स्वाक्षरी 'की'

> निगडीतील डाटा सेंटरमध्ये विद्युत विषयक आणि तांत्रिक अडचण निर्माण झाली आहे. त्यामुळे मंगळवारपासून 'डीएमएस' प्रणाली बंद आहे. प्रणाली सुरू करण्यासाठी तांत्रिक उपाययोजना केल्या जात आहे. आज गुरुवारपर्यंत प्रणाली सुरू करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.
>
> **- किरणराज यादव,सह मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटी.**

तयार करण्यात आल्या आहेत. या प्रणालीवर ११२ कोटींचा खर्च करण्यात आला आहे.

महापालिकेच्या सर्व प्रकारच्या नस्ती तयार करण्यासाठी दस्तऐवज व्यवस्थापन आणि कार्यप्रवाह प्रणालीचा वापर केला जात आहे. या प्रणालीचा वापर करून सर्व कागदपत्रांचे स्कॅनिंग, ट्रॅकिंग, सामायिकरण व शोध घेतला जात आहे. मानवी हस्तक्षेपाने नस्ती स्वीकारणे बंद केले आहे. कार्यप्रवाह प्रणालीमुळे प्रत्येक नस्तीचे कामकाज वेळेत पूर्ण होत असून, वेळेची बचत होत असल्याचा दावा माहिती व तंत्रज्ञान विभागाचा आहे. प्रशासनाचे कामकाज पूर्णतः डिजिटल झाल्यामुळे निर्णयप्रक्रिया, पारदर्शकता वाढीस मदत होणार असल्याचे प्रशासनाचे मत होते. मात्र, या दस्तऐवज व्यवस्थापन प्रणालीत वारंवार व्यत्यय येत आहे. इंटरनेट आणि वीज पुरवठा खंडित झाल्यानंतर नव्याने सर्व प्रक्रिया करावी लागते, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

# नाट्यगृहांच्या स्वच्छतेची 'नांदी'

## नाट्यगृहे, सांस्कृतिक केंद्रांची साफसफाई आणि स्वच्छतेसाठी सव्वा कोटी रुपयांचा प्रस्ताव

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील महापालिकेची सात नाट्यगृहे तसेच सांस्कृतिक केंद्रांची साफसफाई आणि स्वच्छतेसाठी १ कोटी २२ लाख रुपयांच्या निविदा काढण्यात आल्या आहेत. त्यामध्ये बालगंधर्व रंगमंदिरासह यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, पंडित भीमसेन जोशी कलादालन यांचा समावेश आहे. संबंधित ठेकेदाराला हे काम करण्याची परवानगी देण्याबरोबर त्यांच्याशी करारासाठी मान्यता द्यावी, असा प्रस्ताव स्थायी समितीसोर ठेवण्यात आला आहे.

बालगंधर्व रंगमंदिरात नाटकाचा प्रयोग सुरू असताना अचानक उंदीर आणि मांजराचा खेळ नाट्यरसिकांना पाहायला मिळाला होता. कोथरूड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहातदेखील नाटकाचा प्रयोग सुरू असताना एका महिलेच्या पायाजवळून उंदीर गेला होता. नाट्यगृहामध्ये खाद्यपदार्थ नेण्यासाठी मनाई असतानाही खाद्यपदार्थ नेले जात असल्याचे यानिमित्ताने उघड झाले होते. तसेच, नाट्यगृहे आणि कलादालनांमध्ये आवश्यक स्वच्छता होत नसल्याने उंदीर, घुशी, डास असल्याच्या तक्रारी केल्या जात होत्या. या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासनाने हा प्रस्ताव स्थायी समितीसमोर ठेवला आहे.

या प्रकारानंतर महापालिकेने शहरातील नाट्यगृहे, सांस्कृतिक केंद्रे, कलादालने यांची स्वच्छता करण्यासाठी निविदा मागविल्या. यामध्ये बालगंधर्व रंगमंदिर, यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, पंडित जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक भवन, औंध येथील भीमसेन जोशी कलामंदिर, विजय तेंडुलकर नाट्यगृह – सहकारनगर, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे कलादालन, भीमसेन जोशी कलादालन – सहकारनगर यांचा समावेश आहे.



### नाट्यगृहाचे नाव – स्वच्छतेचा खर्च – कर्मचारी

- यशवंतराव चव्हाण नाट्यगृह : २३ लाख २६ हजार : ०८
- लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नाट्यगृह : २३ लाख २६ हजार : ०८
- पंडित नेहरू सांस्कृतिक भवन : २३ लाख २६ हजार : ०८
- भीमसेन जोशी कलादालन, औंध : १७ लाख ४४ हजार : ०६
- बाळासाहेब ठाकरे कलादालन : ११ लाख ६३ हजार : ०४
- विजय तेंडुलकर नाट्यगृह : ११ लाख ६३ हजार : ०४
- भीमसेन जोशी कलादालन, सहकारनगर : ११ लाख ६३ हजार : ०४

एका वर्षासाठी या निविदा काढण्यात आल्या असून, स्वच्छतेसाठी संबंधित ठेकेदार तेथे कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणार आहे. त्यासाठी एक कोटी २० लाख रुपये खर्च केला जाणार आहे. तसेच, या ठिकाणी ४२ कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात येणार आहे, असा प्रस्ताव अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांनी स्थायी समितीसमोर मान्यतेसाठी ठेवला आहे.

दरम्यान, सांस्कृतिक शहर अशी पुणे शहराची ओळख आहे. महापालिकेने विविध भागांमध्ये नाट्यगृहे, सांस्कृतिक भवन, कलादालन उभारली आहेत. मात्र, अनेक नाट्यगृहांमध्ये अपुऱ्या सोयीसुविधा असल्याने त्याची दुरवस्था झाली आहे. महापालिका दर वर्षी नाट्यगृहांच्या डागडुजीवर कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करते. परंतु, त्यानंतरही अस्वच्छता, घाण आणि नाट्यगृहांच्या आजूबाजूच्या परिसरात कचऱ्यांचे ढीग अशा तक्रारी महापालिकेकडे येत असतात.

# आयटी पार्क पिंपरी-चिंचवडमध्ये नकोच!

## आयटीयनच्या मागणीला हिंजवडीसह इतर स्थानिक ग्रामपंचायतींचा तीव्र विरोध

**पुणे | प्रतिनिधी**

राजीव गांधी आयटी पार्क परिसरातील नागरी समस्या सुटत नसल्याने त्याचा समावेश पिंपरी-चिंचवड महापालिकेत करावा, अशी मागणी आयटीयननी केली होती. याला काही स्थानिक लोकप्रतिनिधींनीही पाठिंबा दिला आहे. मात्र, या मागणीला आता स्थानिक ग्रामपंचायतींनी विरोध केला आहे. याचबरोबर आयटी पार्कसाठी स्वतंत्र नगरपालिकेची मागणी त्यांनी केली आहे.

हिंजवडी आयटी पार्कमध्ये खराब रस्ते, पावसाळ्यात पाण्याचा निचरा न होणे यांसह अनेक समस्या आहेत. आयटी पार्कची जबाबदारी विविध शासकीय यंत्रणांमध्ये विभागलेली आहे. त्यात पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए), महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी), पिंपरी-चिंचवड महापालिका, स्थानिक ग्रामपंचायती अशा विविध शासकीय यंत्रणांचा समावेश आहे. या यंत्रणांमध्ये योग्य समन्वय नसल्याने आयटी पार्कमधील नागरी समस्या सुटण्याऐवजी त्यात भर पडते. यंदा पावसाळ्यात आयटी पार्कमधील रस्त्यांवर पाणी साचून त्याचे रूपांतर 'वॉटर पार्क'मध्ये झाले. त्यामुळे आयटी पार्कचा समावेश पिंपरी-चिंचवड महापालिकेत करावा,



### मोहिमेत 25 हजारांहून अधिक जणांचा सहभाग

- आयटी पार्कमध्ये सुमारे पाच लाख आयटी कर्मचारी काम करतात. आयटी पार्कमधील नागरी समस्या सोडविण्यासाठी त्याचा समावेश पिंपरी-चिंचवड महापालिकेत करावा, अशी मागणी फोरम फॉर आयटी एम्प्लॉइज महाराष्ट्र संघटनेने केली असून, यासाठी ऑनलाइन स्वाक्षरी मोहीम सुरू केली आहे. आतापर्यंत २५ हजारांहून अधिक आयटीयन मोठ्या प्रमाणात या मोहिमेत सहभागी होत असून, याबाबत मुख्यमंत्र्यांकडे मागणी केली जाणार आहे.

अशी मागणी आयटीयननी केली होती.

या मागणीला आयटी पार्कमधील हिंजवडी, माण या स्थानिक ग्रामपंचायतींनी तीव्र विरोध दर्शविला आहे. आयटी पार्कमधील समस्यांचा मुद्दा भरकटविला जात असल्याचा दावाही ग्रामपंचायतींनी केला आहे. आयटी पार्क परिसरातील समस्या सोडविण्यासाठी संबंधित सर्व शासकीय यंत्रणांमध्ये योग्य समन्वय गरजेचा असल्याची त्यांची भूमिका आहे. याचबरोबर आयटी पार्कमधील एमआयडीसीच्या हद्दीत नागरी सुविधांची समस्या गंभीर असून, ग्रामपंचायतींच्या हद्दीत रस्त्यांसह इतर सुविधा चांगल्या आहेत, याकडेही त्यांनी लक्ष वेधले आहे.

# रस्टन आणि एसकेएफ कॉलनीत ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र आणि निवारा शेड उभारा

## शिवसेना चिंचवड विधानसभा शहर संघटक संतोष सौंदणकरांची पालिकेकडे मागणी...

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिंचवडगावातील रस्टन कॉलनी आणि एस. के. एफ. कॉलनी येथे ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र आणि निवारा शेड उभारण्यात यावे, अशी मागणी शिवसेना चिंचवड विधानसभा शहर संघटक संतोष सौंदणकर यांनी महापालिकेच्या स्थापत्य विभागाचे शहर अभियंता मकरंद निकम यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



निवेदनात म्हटले आहे कि, चिंचडगावातील रस्टन कॉलनी आणि एस.के.एफ. कॉलनी या दोन्ही कामगार वसाहती आहेत. येथे मोठ्या संख्येने नागरिक वास्तव्यास आहेत. विरंगुळा केंद्र नसल्याने येथील जेष्ठांची मोठी कुचंबणा होते.

सकाळी, संध्याकाळी फेरफटका मारण्यासाठी एकत्रितपणे बाहेर पडलेल्या जेष्ठ नागरिकांना येथील पदपथावरच बसावे लागते. त्यामुळे ज्येष्ठांची गैरसोय होते. पिंपरी-चिंचवड महापालिकेने मागणीची दखल घेऊन जेष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र आणि निवाऱ्याकरिता शेडची उभारणी करून द्यावी. त्यामुळे त्यांची सोय होईल, असे या निवेदनात संतोष सौंदणकर यांनी म्हटले आहे.

# मोशी डॉक्टर्स असोसिएशनतर्फे डॉक्टर्स डे उत्साहात साजरा

## मोशीतील हॉटेल मोशी ग्रँन्ड या ठिकाणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. अमृत पेरणे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

**पिंपरी | प्रतिनिधी**

डॉक्टरांच्या अथक सेवेचा सन्मान...भेटवस्तू... केक कटींग...धन्वंतरी पूजन... वार्षिक सर्वसाधरण सभा... गणेशवंदना...स्नेहभोजन अशा विविध उपक्रमांनी मोशी डॉक्टर्स असोसिएशनतर्फे डॉक्टर्स डे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. मोशीतील हॉटेल मोशी ग्रँन्ड या ठिकाणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. अमृत पेरणे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी विविध शाखेत काम करणारे असोसिएशनचे पदाधिकारी आणि डॉक्टर्स उपस्थित होते. सचिव डॉ. पवन वैरागर यांनी मागील वर्षात केलेल्या उपक्रमांची व पुढील वर्षात नियोजित कार्यक्रमांची माहिती दिली.




असोसिएशनचे खजिनदार डॉ. विशाल कुरकुटे यांनी खर्चाचा तपशील सांगितला. तसेच संस्थापकीय सदस्य डॉ. कृष्णकांत मानकर, डॉ. राहूल साबळे, डॉ. सचिन बोराटे यांच्या हस्ते असोसिएशनच्या संकेतस्थळाचे (वेबसाईट) चे उद्‌घाटन करण्यात आले. सर्व सदस्यांना असोसिएशनचे आयकार्ड आणि भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी कमिटी सदस्य डॉ. शितल मानकर, डॉ. सुरेंद्र वारे, डॉ. भाग्यश्री लहाने-मुंडे, डॉ. शिवदास म्हावरकर, डॉ. मीनल डुंबरे, डॉ. सोनल काटे, डॉ. अभिजीत कुदळे यांनी मोलाचे योगदान दिले. या कार्यक्रमाचे खास वैशिष्ट्य म्हणजे नेत्रतज्ज्ञ डॉ. स्वप्रिल चौधरी यांनी आपल्या बहारदार सूत्रसंचालनाने आणि कवितेने सर्वांची मने जिंकली.

# संजय राऊतांचा राष्ट्रवादीच्या आमदारावर गंभीर आरोप; थेट मुख्यमंत्र्यांना पत्र

## उबाठा गटाचे नेते खासदार संजय राऊत यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पत्राचे मावळचे आमदार सुनील शेळके यांच्यावर गंभीर आरोप केला आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

उबाठा गटाचे नेते खासदार संजय राऊत यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पत्राचे मावळचे आमदार सुनील शेळके यांच्यावर गंभीर आरोप केला आहे. त्यांनी यासंदर्भात थेट कारवाईसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना यांना पत्र लिहिले आहे.

या पत्राचे फोटो त्यांनी त्यांच्या एक्स सोशल मीडियाच्या माध्यमावर शेअर केले आहेत. सुनील शेळके यांनी राज्य शासनाची हजारो कोटींची रॉयल्टी बुडवून सरकारची फसवणूक केल्याचा गंभीर आरोप राऊतांनी केला आहे. त्यांच्या या आरोपामुळे खळबळ उडाली आहे.

भ्रष्टाचार व जनतेची फसवणूक वगैरे विषयांवर आपण नेहमीच बोलत असता. भ्रष्टाचाऱ्यांना तुरुंगात पाठवू असे आपले धोरण आहे. प्रत्यक्षात राज्यातले चित्र नेमके उलटे आहे. कुंपणच शेत खात असून शेत खाणाऱ्यांना सरकारचे अभय असल्याचे स्पष्ट दिसत आहे, असे संजय राऊत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे.



### एसआयटी स्थापन करून चौकशीचे आदेशही द्यावेत.

**» मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्यावी लूट कशा पद्धतीने सुरू आहे याचे हे उत्तम उदाहरण आहे. पैशाअभावी ज्यातील अनेक योजना रखडल्या, शेतकयांची कर्जमाफी होत नाही, पण शेळकेसारखे आमद्वार सरकारची लूट करून बार झाले, या प्रकरणी गुन्हा दाखल करावाच, पण एसआयटी स्थापन करून चौकशीचे आदेशही द्यावेत.**

संजय राऊत यांनी केलेला आरोप आमदार सुनील शेळके यांनी फेटाळून लावले आहेत. त्यांच्याकडे पुरावे असतील तर त्यांनी समोर आणावेत त्यानंतर मी याविषयी खुलासा करणार असल्याचे शेळके यांनी माध्यमांना दिलेल्या प्रतिक्रियेत म्हटले आहे.

बेकायदेशीर उत्खनन केलेल्या सर्व क्षेत्राची मोजणी करून संपूर्ण रॉयल्टी दंडासह वसूल करण्याबाबतचे आदेश आपल्या कार्यालयामार्फत देण्यात यावेत. महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाने संपादनासाठी लढलेली अधिसूदना त्वरित रद्द करावी व संबंधितांवर त्वरित फौजदारी कार्यवाही करावी, अशी मागणी संजय राऊत यांनी पत्राद्वारे मुख्यमंत्र्यांना केली आहे.

राजकीय जोडे राजकाणातपुरात ठेवावे सूडबोधीचे राजकारण न करता वैचारिक राचकारण असेल पाहिजे, असा निशणा साधला आहे. माझ्यावर आरोप करताना पुरावे घेऊन यावे. आरोप करून चर्चेत राहिच असले, तर तो हेतू हाणून पाडू असे थेट इशारा सुनील शेळके यांनी संजय राऊतांना दिला आहे .

### सुनील शेळकेंनी आरोप फेटाळले

**» संजय राऊत यांनी केलेले आरोप सुनील शेळके यांनी फेटाळले आहेत. कोणत्याही प्रकाराचे पुरावे नसताना आरोप केले जात आहेत. त्याची माहिती देऊन पुरावे द्यावे तोपर्यंत मी याबातीत कुठलाही खुलासा देणार नाही. जोपर्यंत पुरावे देत नाही तोपर्यंत त्यांच्या आरोपांना उत्तर देणार नाही. ते बुनबुडाचे आरोप करत असून यामध्ये कोणतेही तथ्य नाही, असे सुनील शेळके म्हणाले.**

### पत्रात काय म्हटलयं?

**» शासनाने महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळासाठी, औद्योगिक क्षेत्र टप्पा क्रमांक ४ येथे मावळातील गाव मौजे आंबळे आहे. या गावात व त्या शेजारी अनेक क्रशर उद्योजकांच्या खाणी आहेत. सदर जमीन महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळास वापरण्यासाठी योग्य नसल्याने ते सर्व खाणीचे गट, जमिनी वगळण्यात आल्या.तरी सुनील शेळके यांनी त्यांच्या आमदार पदाचा दुरुपयोग करून औद्योगिक क्षेत्रामध्ये आंबळे येथील त्यांच्या व त्यांच्या कुटुंबीयांच्या मालकीच्या २९ हेक्टर ८६.१० आर क्षेत्रावर महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाने शासन निर्णय (१९६१ च्या प्रकरण ६) काढून सदरच्या जमिनी संपादन करत आहेत व तसेच शासनाची कोणतीही परवानगी न घेता मोठ्या प्रमाणावर दगड खाणींचे बेकायदेशीर उत्खनन केले आहे. शेळके यांनी कोणत्याही प्रकारची रॉयल्टी भरलेली नाही, असा आरोप संजय राऊत यांनी केला आहे.**

# वृक्षारोपणातून पर्यावरण संवर्धनास हातभार; वसंतराव नाईक जयंतीनिमित्त नसरापूर वनविभागाचा उपक्रम

## इंगवली आणि दत्तगड येथे 99 हजार वृक्षांची मियावाकी पद्धतीने लागवड

**पुणे | प्रतिनिधी**

पर्यावरण संवर्धनासाठी राज्य शासनाने राबवलेला ‘हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र’ उपक्रम अधिक व्यापक बनवण्यासाठी यावर्षी १० कोटी वृक्ष लागवड मोहिमेची घोषणा करण्यात आली आहे. त्याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व हरित क्रांतीचे जनक स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त नसरापूर वनविभाग आणि स्थानिक कर्मचाऱ्यांनी मिळून भव्य वृक्षारोपण उपक्रम राबवला.

हा उपक्रम मौजे इंगवली (फॉ. कं.नं. 421) व मौजे भांबवडे – दत्तगड (फॉ.कं.नं. 511) येथील अटल घन वन प्रकल्पांतर्गत घेण्यात आला. मियावाकी पद्धतीने सुमारे ९९,००० देशी वृक्षांची लागवड करण्यात आली असून इंगवली येथे ६६,००० आणि दत्तगड येथे ३३,००० वृक्षांचे रोपण झाले.

जांभूळ, वड, पिंपळ, बहावा, कडुलिंब यांसारख्या स्थानिक आणि जैवविविधतेला पोषक अशा प्रजातींची निवड करण्यात आली आहे. हे वृक्ष भविष्यात परिसरात तापमान संतुलन, पाण्याचा साठा, जमिनीची गुणवत्ता व वन्यजीवांचे अधिवास निर्माण करण्यासाठी मोलाचे ठरणार आहेत.

कार्यक्रमात वनपरिक्षेत्र अधिकारी . वसंत चव्हाण, वनपाल श्रीमती पद्मिनी कांबळे, . संदीप जोशी, वनरक्षक . अवधूत गुजर व . तुषार कुंभार यांच्यासह वनविभागातील सर्व कर्मचारी सहभागी झाले होते. सर्वांनी मिळून वृक्षारोपण केले आणि



स्व. वसंतराव नाईक यांना पर्यावरणपूरक अभिवादन केले.

त्यांच्या पुढाकारामुळे महाराष्ट्र अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला. त्यामुळेच त्यांना ‘हरित क्रांतीचे जनक’ ही उपाधी मिळाली. त्यांच्या स्मृतिदिनानिमित्ताने करण्यात आलेली ही वृक्षलागवड त्यांच्याच विचारांची आणि कार्याची आठवण करून देणारी ठरली.

### हरित क्रांतीचे खरे शिल्पकार

**» स्व. वसंतराव फुलाजी नाईक हे महाराष्ट्राच्या राजकारणातील एक तेजस्वी व्यक्तिमत्त्व होते. १९६३ ते १९७५ या कालखंडात सलग १२ वर्षे मुख्यमंत्री राहून त्यांनी राज्याच्या ग्रामीण, कृषी आणि जलसंधारण क्षेत्रात आमूलाग्र बदल घडवले. शेतीत तंत्रज्ञानाचा वापर, सिंचन योजनांचे विस्तार, जमीन सुधारणांवर भर आणि कृषी विद्यापीठांची स्थापना या त्यांच्या निर्णयांनी हरित क्रांतीला गती दिली.**

### पर्यावरणपूरक भविष्याची पायाभरणी

**» मियावाकी पद्धतीने तयार होणारी अटल घन वने परिसरात घनदाट, नैसर्गिक आणि जैवविविधतेने समृद्ध पर्यावरण प्रणाली तयार करणार आहेत. भविष्यातील पर्यावरण शिक्षण आणि पर्यटनासाठी देखील हि ठिकाणे उपयुक्त ठरतील. राज्य शासनाच्या 10 कोटी वृक्ष लागवड उपक्रमाला अशा प्रयत्नांमुळे नवी दिशा मिळत असून, सर्वसामान्यांनीही यामध्ये सक्रिय सहभाग घ्यावा.**